जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
04 FEB 2017
महाराष्ट्र टाईम्स

# गुणवत्तावाढीवरच 'नॅक'ची तयारी हवी

**म. टा. प्रतिनिधी, कोल्हापूर**

'शिक्षणक्षेत्रातील प्रगतीचा आलेख पाहिल्यास संख्यात्मक वाढ झाल्याचे दिसून येते. मात्र गुणात्मक वाढ हा शैक्षणिक प्रगतीचा कणा आहे. त्यामुळे भविष्यात नॅक मूल्यांकनात अव्वल ठरायचे असेल तर महाविद्यालयांनी गुणात्मक वाढीवरच नॅकसाठी तयारी करणे आवश्यक आहे,' असे मत शिवाजी विद्यापीठाचे बीसीयूडी संचालक डॉ. डी आर. मोरे यांनी व्यक्त केले. छत्रपती शाहू इन्स्टिट्यूट ऑफ बिझनेस एज्युकेशन अँड रिसर्च (सायबर) तर्फे प्राचार्यांसाठी 'अचिव्हिंग इन्स्टिट्युशनल एक्सलन्स' विषयावरील एक दिवसीय बैठकीच्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते.

डॉ. डी. आर. मोरे यांचे मत

शहरातील महाविद्यालयांनी नॅक समितीच्या निकषपूर्तीच्या कक्षेत समाविष्ट होण्याच्यादृष्टिने महाविद्यालयीन स्तरावर प्रयत्न करण्याचा निर्णय प्राचार्यांच्या बैठकीत घेण्यात आला. या बैठकीत नॅकच्या मूल्यांकन प्रक्रियेबाबत आवश्यक असलेल्या निकषांसंदर्भात तयारी करण्याची सविस्तर चर्चा करण्यात आली.

डॉ. मोरे म्हणाले, 'सध्याची शिक्षण पद्धती ही विद्यार्थीकेंद्रीत आहे. शिक्षण क्षेत्रात अनेक अमूलाग्र बदल होत असताना महाविद्यालयाने या बदलांकडे सकारात्मकदृष्टिने पाहिले पाहिजे. 'नॅक'च्या माध्यमातून महाविद्यालयांची गुणवत्ता तपासली जाते. महाविद्यालयांनी 'नॅक'ला सामोरे जाताना आपल्यातील गुणवत्ता, दर्जा टिकविणे गरजेचे आहे.

पहिल्या सत्रात आयक्यूएससी विभागाचे समन्वयक डॉ. टी. व्ही. शर्मा म्हणाले, 'नॅक मूल्यांकनामध्ये श्रेणीकरण कार्यपद्धतीला महत्त्व आहे. बहुतांशी महाविद्यालयांना हे अहवाल तयार करताना अनेक समस्या व अडचणींना सामोरे जावे लागते. याबाबत अभ्यास केला पाहिजे. उत्कृष्ट सादरीकरण करण्यासाठी प्रयत्न केले पाहिजे.'

'सायबर'चे संचालक डॉ. एम. एम. अली यांनी 'संस्थेच्या मूल्यांकन-श्रेष्ठतेची गरज आणि संबंध' या विषयावर मार्गदर्शन केले. कुलसचिव डॉ. व्ही. डी. नांदवडेकर यांनी मार्गदर्शन केले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
4 FEB 2017
तरुण भारत

# विद्यार्थ्यांनी तंत्रज्ञान वापरातून विकास साधावा



तिसंगी : म.ह. शिंदे महाविद्यालयात वार्षिक पारितोषिक वितरण समारंभाचे उद्घाटन करताना कुलसचिव डॉ. व्ही. डी. नांदवडेकर. सोबत पी.जी. शिंदे, नरेंद्र सरदेसाई, जनार्दन शिंदे, स्वप्निल शिंदे, प्राचार्य डॉ. एन. के. शिंदे आदी.

वार्ताहर
साळवण

तंत्रज्ञानाचा वापर करून विकासाची वाट आजच्या विद्यार्थ्यांनी धरावी असे मत शिवाजी विद्यापीठाचे कुलसचिव डॉ. व्ही. डी. नांदवडेकर यांनी व्यक्त केले. तिसंगी (ता. गगनबावडा) येथील म. ह. शिंदे महाविद्यालयात वार्षिक पारितोषिक वितरण आणि सांस्कृतिक समारंभात ते बोलत होते. अध्यक्षस्थानी ज्ञानसाधना शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष पी. जी. शिंदे होते.

प्रास्ताविक प्राचार्य डॉ. एन. के. शिंदे यांनी केले. सांस्कृतिक विभागप्रमुख प्रा. डी. बी. इंगवले, जिमखाना प्रमुख प्रा. बी. डी. पाटील यांनी अहवाल वाचन केले. यावेळी संस्थेचे उपाध्यक्ष नरेंद्र सरदेसाई सहसचिव जनार्दन शिंदे, संचालक स्वप्नील शिंदे उपस्थित होते. यावेळी जिमखाना विभागाच्या वतीने आयोजित केलेल्या विविध स्पर्धांचे बक्षीस वितरण मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. दोन दिवस झालेल्या या समारंभात वार्षिक पारितोषिक वितरण, वेशभूषा स्पर्धा, आणि सांस्कृतिक कार्यक्रम पार पडले. सूत्रसंचालन प्रा. एन. के. मोळे यांनी केले तर आभार डॉ. आर. पी. पाटील यांनी आभार मानले.

**कुलसचिव नांदवडेकर यांचे आवाहन**

जनसंपर्क कक्ष
4 FEB 2017
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
पुढारी

# नाईट कॉलेजमध्ये आज राष्ट्रीय चर्चासत्र

**कोल्हापुर :** आंतरविद्याशास्त्रीय राष्ट्रीय चर्चासत्राचे नाईट कॉलेज ऑफ आर्टस् अँड कॉमर्स मध्ये शनिवारी (दि ४) आयोजन करण्यात आले आहे. चर्चासत्राच्या उद्घाटनप्रसंगी कौन्सिल ऑफ एज्युकेशनच्या अध्यक्षा रजनीताई मगदूम, शिवाजी विद्यापीठाचे कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर यांच्यासह एज्युकेशनचे उपाध्यक्ष प्रसाद कामत, व्यवस्थापन परिषदेचे सदस्य अॅड. व्ही. एन. पाटील, प्राचार्य एल. एम. गौड उपस्थित राहणार आहेत. यावेळी साहित्यिक डॉ. राजन गवस बीजभाषण देणार असून, डॉ. एन.डी. पाटील हे मार्गदर्शन करणार आहेत. यानिमित्ताने संशोधक, प्राध्यापकांच्या शोधनिबंध संग्रहाचे प्रकाशन केले जाणार आहे. चर्चासत्रात कर्नाटक, राजस्थान, गुजरात, मध्यप्रदेश, गोवा, महाराष्ट्र आदी राज्यांतील संशोधक, प्राध्यापक शोधनिबंध सादर करतील.

4 FEB 2017

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

लोकमत

## पी. पी. वडगांवकर : शिवाजी विद्यापीठातील रसायनशास्त्रातील परिषदेचा समारोप

# तंत्रज्ञानातील बदलामुळे प्रगती शक्य

कोल्हापूर : विज्ञान आणि तंत्रज्ञानातील बदलांमुळे प्रगती साधणे शक्य आहे. विज्ञानात सतत होणारे बदल समजावून घेऊन त्यानुसार देशाच्या प्रगतीत मोलाचा वाटा तरुण संशोधकांनी उचलावा, असे प्रतिपादन पुण्यातील रासायनिक प्रयोगशाळेमधील शास्त्रज्ञ डॉ. पी. पी. वडगांवकर यांनी गुरुवारी येथे केले.

शिवाजी विद्यापीठातील रसायनशास्त्र अधिविभागाने आयोजित केलेल्या संशोधनविषयक दोन दिवसीय राष्ट्रीय परिषदेच्या समारोपप्रसंगी ते बोलत होते. डॉ. वडगांवकर म्हणाले, संशोधकांनी नावीन्याचा सातत्याने शोध घ्यावा. कार्यक्रमात डॉ. सी. व्ही. रोडे यांनी बायोडिझेलपासून रासायनिक पदार्थ हरित पद्धतीचा अवलंब करून अनेक रासायनिक उपयुक्त वस्तू तयार करता येतात याचे उदाहरणांसह मार्गदर्शन केले. यावेळी प्रा. के. एम. गरडकर, आदींसह विद्यार्थी उपस्थित होते. विद्यापीठातील रसायनशास्त्र अधिविभागप्रमुख प्रा. पी. एन. भोसले यांनी प्रास्ताविक केले. परिषदेचे समन्वयक डॉ. जी. एस. राशनकर यांनी अहवाल सादर केला. सचिव डॉ. डी. एम. पोरे यांनी आभार मानले. (प्रतिनिधी)




शिवाजी विद्यापीठात गुरुवारी राष्ट्रीय परिषदेच्या समारोपप्रसंगी शास्त्रज्ञ डॉ. पी. पी. वडगांवकर यांनी मार्गदर्शन केले. यावेळी शेजारी डॉ. जी. एस. राशनकर, पी. एन. भोसले, डी. एम. पोरे उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
4 FEB 2017
पुढारी

# 'तरुण संशोधकांनी देशाच्या प्रगतीत हातभार लावावा'

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

विज्ञान आणि तंत्रज्ञानातील बदलांमुळे प्रगती करणे शक्य आहे. विज्ञानात सतत होणारे बदल समजावून घेऊन तरुण संशोधकांनी देशाच्या प्रगतीत मोलाचा वाटा उचलावा, असे प्रतिपादन पुणे येथील रासायनिक प्रयोगशाळमधील शास्त्रज्ञ डॉ. पी. पी. वडगावकर यांनी केले.

शिवाजी विद्यापीठातील रसायनशास्त्र अधिविभागातर्फे आयोजित दोन दिवसीय राष्ट्रीय परिषदेच्या समारोपप्रसंगी ते बोलत होते. डॉ. वडगावकर म्हणाले, संशोधकांनी नावीन्याचा सातत्याने शोध घेऊन त्यापासून पेटंट मिळविण्याचा प्रयत्न करावा. रासायनिक प्रयोगशाळेतील डॉ. सी. व्ही. रोडे यांनी बायो डिझेलपासून रासायनिक पदार्थ हरित पद्धतीचा अवलंब करून अनेक रासायनिक उपयुक्त वस्तू तयार करता येतात याबाबत मार्गदर्शन केले. प्रास्ताविक रसायनशास्त्र अधिविभागप्रमुख प्रा. पी. एन. भोसले यांनी केले. परिषदेचा अहवाल समन्वयक डॉ. जी. एस. राशनकर यांनी सादर केला. आभार डॉ. डी. एम. पोरे व प्रा. के. एम. गरडकर यांनी मानले.

4 FEB 2017

पुण्यनगरी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# शिवोत्सवातून घडणार भारतीय संस्कृतीचे दर्शन

## १० फेब्रुवारीपासून युवा महोत्सव; १२५ विद्यापीठांतील दीड हजार विद्यार्थी होणार सहभागी

**कोल्हापूर / प्रतिनिधी :**

शिवाजी विद्यापीठात तरुणाईच्या विविध कलागुणांचे दर्शन घडविणारा 'शिवोत्सव-२०१७' हा युवा महोत्सव १० ते १४ फेब्रुवारी दरम्यान रंगणार आहे. असोसिएशन ऑफ इंडियन युनिव्हर्सिटीज आणि केंद्र सरकारच्या क्रीडा आणि युवा मंत्रालयाच्या सहकार्याने आठ वर्षांनंतर विद्यापीठामध्ये हा महोत्सव होत आहे. त्यात देशभरातील १२५ विद्यापीठांमधील दीड हजार विद्यार्थी-विद्यार्थिनी कलाकार सहभागी होणार आहेत. महोत्सवाची विद्यापीठात जय्यत तयारी सुरू आहे.

विविध कलाप्रकारांद्वारे भारतीय संस्कृतीचे संवर्धन व्हावे तसेच महाविद्यालयीन विद्यार्थी-विद्यार्थिनींच्या कलागुणांना राष्ट्रीय पातळीवरील व्यासपीठ उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने एआययू आणि केंद्र सरकारच्या क्रीडा आणि युवा मंत्रालयातर्फे दरवर्षी राष्ट्रीय आंतरविद्यापीठीय युवा महोत्सव आयोजित केला जातो. गेल्या वर्षीचा युवा महोत्सव म्हैसूरमध्ये झाला होता. यंदाचा ३२ वा महोत्सव शिवाजी विद्यापीठात होणार आहे. त्यात संगीत, गायन, फाईन आर्ट, नृत्य, प्रश्नमंजूषा, वक्तृत्व, लघुनाटिका, मूकनाट्य, एकांकिका अशा विविध २६ कला प्रकारांमध्ये



महोत्सवात स्पर्धा होतील. देशातील पूर्व, पश्चिम, दक्षिण, उत्तर आणि मध्यवर्ती विभागातील महोत्सवातील विविध कला प्रकारांमधील पहिल्या तीन क्रमांकांच्या विजेत्या विद्यापीठांचे संघ 'शिवोत्सव'मध्ये सहभागी होतील. 'शिवोत्सव'मध्ये देशातील विविध विद्यापीठांमधील सुमारे दीड हजार विद्यार्थी-विद्यार्थिनी कलाकार सहभागी होतील. त्यांच्या कलागुणांच्या माध्यमातून भारतीय संस्कृतीचे कोल्हापूरकरांना दर्शन घडणार आहे.

या महोत्सवातील विजेत्यांची निवड दक्षिण आशियाई आंतरविद्यापीठ युवा महोत्सवासाठी होणार आहे. शिवाजी विद्यापीठाने केलेल्या मागणीनुसार 'एआययू'ने या वर्षीच्या महोत्सवाचे यजमानपद विद्यापीठाला दिले असल्याचे विद्यापीठ विद्यार्थी कल्याण मंडळाचे संचालक डॉ. आर. व्ही. गुरव यांनी सांगितले. यावेळी त्यांनी यंदा या युवा महोत्सवाला विद्यापीठाने 'शिवोत्सव' असे नाव दिले आहे. आठ वर्षांनंतर विद्यापीठाला या महोत्सवाचे संयोजन करण्याची संधी मिळाली आहे. त्याची तयारी गेल्या महिन्यापासून सुरू आहे. यासाठी निवास, जेवण, परीक्षक नियुक्ती आदी स्वरूपातील विविध २६ समित्यांची नियुक्ती केली असल्याचेही डॉ. गुरव यांनी सांगितले.

4 FEB 2017

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

लोकमत

# कौशल्य, नोकरीसाठी विद्यापीठात गर्दी

## सुमारे १ हजार उमेदवारांचा सहभाग; तंत्रज्ञान विभागातील रोजगार मेळावा

**कोल्हापूर** : औद्योगिक, आयटी, विमा, आदी क्षेत्रांतील कौशल्य आणि नोकरी मिळविण्यासाठी शिवाजी विद्यापीठात तंत्रज्ञान अधिविभाग परिसरात शुक्रवारी तरुणाईने गर्दी केली. तंत्रज्ञान अधिविभाग, राज्य शासनाचा विद्यापीठ कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता माहिती व मार्गदर्शन केंद्रातर्फे आयोजित कौशल्य व रोजगार मेळाव्यात सुमारे १ हजार उमेदवार सहभागी झाले.

मेळाव्यात १६ कंपन्यांमधील ७६४ पदांसाठी भरती प्रक्रिया घेण्यात आली. त्यात १ हजार ३४ उमेदवारांनी सहभाग घेऊन मुलाखती दिल्या. यातील २४१ उमेदवारांची प्राथमिक निवड करण्यात आली. समुपदेशन व कॅशलेस व्यवहार कसे करावेत याबाबतची माहिती ५० जणांनी घेतली. पत्र, बायोडाटा लेखन, संवादकौशल्य आदींच्या तज्ज्ञांच्या मार्गदर्शन सत्राचा लाभ ६६० जणांनी घेतला. विद्यापीठातील तंत्रज्ञान विभागाच्या इमारतीतील विविध वर्गांमध्ये मेळाव्यासाठी मुलाखती घेण्याची व्यवस्था केली होती. दरम्यान, मेळाव्याचे उद्‌घाटन विद्यापीठाचे प्रभारी कुलगुरू डॉ. डी. आर. मोरे यांच्या हस्ते झाले. यावेळी डॉ. मोरे म्हणाले, तरुण-तरुणींनी विविध कौशल्ये आत्मसात करणे ही काळाची गरज आहे. इंग्रजी संभाषण कला आणि शिष्टाचार शिकणे महत्त्वाचे आहे. तंत्रज्ञान अधिविभागाचे संचालक डॉ. जे. एस. बागी म्हणाले, स्पर्धात्मक युगात विद्यार्थ्यांनी कौशल्य विकसित करणे अनिवार्य आहे. कार्यक्रमास प्रा. उदय पाटील, प्रशांत पाटील, पी. ए. प्रभू आदी उपस्थित होते. ट्रेनिंग अ‍ॅण्ड प्लेसमेंट सेलचे समन्वयक डॉ. एस. बी. सादळे यांनी स्वागत केले. विद्यापीठ कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता माहिती व मार्गदर्शन केंद्राचे सहायक संचालक सचिन जाधव यांनी प्रास्ताविक केले. प्रा. अमर डूम यांनी आभार मानले. (प्रतिनिधी)

### संबंधित कंपन्यांशी संपर्क साधावा

या वर्षामधील हा दुसरा रोजगार मेळावा आहे. ज्या उमेदवारांना काही कारणास्तव रोजगार मेळाव्यामध्ये मुलाखतीसाठी उपस्थित राहता आला नाही त्यांनी प्रत्यक्ष ज्या-त्या आस्थापनांमध्ये जाऊन संपर्क साधावा, असे 'रोजगार व उद्योजकता माहिती व मार्गदर्शन' केंद्राचे सहायक संचालक सचिन जाधव आवाहन केले.

4 FEB 2017
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

सकाळ

# स्त्रियांच्या सहभागाशिवाय देशाचा विकास अशक्य

## डॉ. सोनाळकर : 'भारतातील लैंगिकतेचा प्रश्न व समस्या'वर चर्चासत्र

सकाळ वृत्तसेवा

कोल्हापूर, ता. ३ : स्त्रियांच्या सहभागाशिवाय देशाचा विकास अशक्य असल्याचे मत टाटा इन्स्टिट्यूट ऑफ सोशल सायन्सेस, मुंबई येथील ॲडव्हान्स सेंटर फॉर वुमेन्स स्टडीजच्या प्रा. डॉ. वंदना सोनाळकर यांनी आज येथे केले.

शिवाजी विद्यापीठातील समाजशास्त्र अधिविभागाच्या वतीने यूजीसी, सॅप डीआरएस फेज - ३ अंतर्गत आयोजित केलेल्या 'भारतातील लैंगिकतेचा प्रश्न व समस्या' विषयावरील राष्ट्रीय चर्चासत्रात त्या बोलत होत्या. बीसीयूडीचे संचालक डॉ. डी. आर. मोरे अध्यक्षस्थानी होते.

प्रा. सोनाळकर म्हणाल्या, "स्त्रियांवर होणारे अत्याचार ही भारतामध्ये नवीन बाब नाही. शारीरिक, मानसिक पातळीवर होणाऱ्या अत्याचारात वाढच होत असल्याचे 'एनएसएस'च्या सर्वेक्षणानुसार दिसून येते. भारत हा कृषिप्रधान देश असल्यामुळे स्त्रियांवर जोखीमही सर्वाधिक आहे. स्वातंत्र्योतर काळात झालेल्या अनेक आंदोलनांमुळे काही अंशी स्त्रियांच्या परिस्थितीत बदल झाला आहे. समाजसुधारक महात्मा फुले, राजर्षी शाहू महाराज, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी स्त्री प्रश्नांसंबंधी केलेल्या कार्यामुळे आज सर्वच क्षेत्रांत स्त्रिया आघाडीवर आहेत. राजकीय क्षेत्रात जरी आरक्षण असले तरी म्हणावा तसा सहभाग जाणवत नाही."

डॉ. मोरे म्हणाले, "स्वातंत्र्यपूर्व काळात स्त्री शिक्षणावर अनेक निर्बंधांमुळे शिक्षणातील टक्का हा अत्यंत कमी होता; परंतु अनेकांच्या प्रयत्नांमुळे आजची सकारात्मक स्थिती निर्माण झाली आहे. भारत जर महासत्ता व्हायचा असेल स्त्रियांना सर्वच क्षेत्रांत समान संधी मिळायला हवी. लिंगाधारित भेदभाव नष्ट झाल्याशिवाय भारतास प्रगती साधता येणार नाही. अलीकडे राजकारणात महिलांचा प्रवेश हा आशादायक वाटत आहे."

या वेळी डॉ. आर. बी. पाटील, डॉ. विजय मारुलकर, प्रा. बी. के. नागला, प्रा. एस. सी. राजोरा, प्रा. श्रीकृष्ण महाजन, प्रा. भारती पाटील उपस्थित होते. समन्वयिका डॉ. प्रतिमा पवार यांनी सूत्रसंचालन केले. विभागप्रमुख डॉ. जगन कराडे यांनी प्रास्ताविक केले. डॉ. प्रल्हाद माने यांनी पाहुण्यांची ओळख करून दिली. डॉ. प्रतिभा देसाई यांनी आभार मानले.

4 FEB 2017

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

सकाळ

# सध्याच्या गोंधळाच्या वातावरणात 'उभं आडवं' पुस्तक मार्गदर्शक

## डॉ. एन. डी. पाटील : शिवाजी विद्यापीठात चर्चासत्र

कोल्हापूर, ता. २ : जात, धर्म व साहित्य विषयाबाबतचे मत परखडपणे मांडणाऱ्या राहुल कोसंबी यांच्या 'उभं आडवं' पुस्तकाचे महत्त्व मोठे आहे, असे प्रतिपादन ज्येष्ठ विचारवंत प्रा. डॉ. एन. डी. पाटील यांनी केले.

शिवाजी विद्यापीठाचा मराठी विभाग व मुंबईतील मुक्त शब्द मासिक यांच्या विद्यमाने राहुल कोसंबी लिखित 'उभं आडवं' पुस्तकाच्या निमित्ताने आयोजित चर्चासत्रात ते बोलत होते. किशोर बेडकिहाळ अध्यक्षस्थानी होते. गणित अधिविभागाच्या सभागृहात चर्चासत्र झाले.



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाचा मराठी विभाग व मुंबईतील मुक्त शब्द मासिक यांच्या विद्यमाने राहुल कोसंबी लिखित 'उभं आडवं' पुस्तकाच्या निमित्ताने आयोजित चर्चासत्रात बोलताना ज्येष्ठ विचारवंत प्रा. डॉ. एन. डी. पाटील. शेजारी किशोर बेडकिहाळ, प्रा. डॉ. राजन गवस, राहुल कोसंबी, येशू पाटील.

डॉ. पाटील म्हणाले, "सध्याचा काळ हा संभ्रमात टाकणारा व गोंधळाचा आहे. सामाजिक, राजकीय व सांस्कृतिक अशा सर्व क्षेत्रांत आशादायक वाटावे असे वातावरण नाही. या पार्श्वभूमीवर कोसंबी यांनी चिंतनात्मक लिहिलेल्या पुस्तकाचे महत्त्व मोठे आहे. गेल्या शंभर वर्षांत राजकीय, सामाजिक चळवळींनी अनेक गोष्टी आपल्या सोयीने वापरल्याने जात, धर्मविषयक गुंते निर्माण होऊन गोंधळाचे वातावरण वाढले आहे. त्यासाठी हे पुस्तक आशावादी आहे."

मराठी विभागप्रमुख डॉ. राजन गवस म्हणाले, "वैचारिक लेखन व आंतरविद्याशाखीय अभ्यासच होत नसून लोक स्पेशलायझेशनच्या जमान्यात वावरताहेत. अशा काळात कोसंबींचे पुस्तक नव्या पिढीसाठी दिशादर्शक आहे. त्यामुळे विभागातील विद्यार्थी व नवअभ्यासकांसाठी दिशादर्शन व्हावे, म्हणून ही चर्चा घडवून आणली आहे."

लेखक कोसंबी यांनी लेखनामागील भूमिका स्पष्ट केली. डॉ. गजानन अपिने, डॉ. रणधीर शिंदे, केशव वाघमारे, उदय रोटे यांनी पुस्तकावर अभ्यासपूर्ण निबंध वाचले. येशू पाटील, आनंद तेलतुंबडे, ज्येष्ठ समीक्षक डॉ. हरिश्चंद्र थोरात, शुभांगी थोरात, नितीन वाघ उपस्थित होते. सुस्मिता खुटाळे यांनी सूत्रसंचालन केले. डॉ. नंदकुमार मोरे यांनी आभार मानले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
- 4 FEB 2017
तरुण भारत

# 'उद्योजक विकास' विषयावर व्याख्यान

**कोल्हापूर :** सूक्ष्म , लघु आणि मध्यम उद्योग मंत्रालय भारत सरकार यांच्या तर्फे 'इनक्युबेटर उद्योजगता आणि व्यवस्थापन विकास योजना" या विषयावर व्याख्यान झाले. यामध्ये सक्षम भावी उद्योजक घडवण्याच्या उद्देशाने राबवण्यात येणाऱ्या भारत सरकारच्या इंक्युबेटर योजनेची माहिती तंत्रज्ञान अधिविभागाच्या विद्यार्थ्यांना देण्यात आली.

सुक्ष्म ,लघू आणि मध्यम उद्योग मंत्रालयातर्फे शिवाजी पाटील व अभय दप्तरदार यांनी मार्गदर्शन केले. इच्छुक विद्यार्थांना लघु व मध्यम उद्योग सुरु करण्यासाठी आर्थिक मदत तसेच मार्गदर्शन केले जाते. चर्चेमध्ये विद्यार्थांनी विचारलेल्या विविध शंकांचे निरसणही करण्यात आले. विविध कंपन्यांच्या प्रतिनिधींनी विद्यार्थ्यांशी संवाद साधला. शिवाजी विद्यापीठातील अधिविभागाचे संचालक प्रा. डॉ. जयदीप बागी यांनी तंत्रज्ञान अधिविभागातील ट्रेनिंग व प्लेसमेंट सेलचे प्रा.अमर डूम यांनीही विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.